# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

## रविवार, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२६ / फाल्गुन ३, १९४७ (शके)

**१४. म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख सूचना ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्याबाबत**

**सर्व सन्माननीय विधानपरिषद सदस्यांना कळविण्यात येते की :-**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ पासून विधानभवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या सन २०२६ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनासाठी द्यावयाच्या म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेखाच्या सूचना सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ पासून **SMOIS** या संगणकीय प्रणालीवर महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे कार्यालय सुरु झाल्यापासून म्हणजेच सकाळी ९.३० वाजल्यापासून सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. या संगणकीय प्रणालीवर म.वि.प. नियम १०१-अ अन्वये उपस्थित करण्यासंबंधीची विशेष उल्लेख सूचना ज्या दिवशी सभागृहात उपस्थित करावयाची असेल त्या दिवसाच्या आदल्या दिवशी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत **SMOIS** या संगणकीय प्रणालीवर देता येईल व सायंकाळी ५.०० नंतर या प्रणालीवर सूचना स्वीकारणे बंद होईल.

२. **ONLINE** पध्दतीने प्राप्त होणाऱ्या विशेष उल्लेखाच्या सूचनांना संगणकीय प्रणालीद्वारे आपोआपच अनुक्रमाने नोंदणी क्रमांक दिला जाईल व त्याबाबत मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचा निर्णय अंतिम असेल.

३. म.वि.प.नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख सूचना पूर्णत: **ONLINE** पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी पुन्हा त्याच विषयाची पुनरावृत्ती करणारी सूचना **OFFLINE** पध्दतीने दिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

..२/-

४. महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१-अ अन्वये सूचनेचा विषय हा गंभीर स्वरुपाच्या व तातडीच्या सार्वजनिक महत्वाच्या कोणत्याही बाबीसंबंधातील, स्पष्ट, एकाच विभागाशी संबंधित, मुद्देसूद व थोडक्यात ठेवून सूचनाधीन विषयाचा सारांश २ ते ३ ओळींमध्ये असणे आवश्यक आहे. तसेच सूचनेचा विषय ज्या विभागाशी संबंधित आहे त्या विभागाचे नांव स्पष्टपणे दर्शविण्यात यावे.

५. म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत सूचना सभागृहात घेण्यासंबंधीचा पूर्ण अधिकार मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचा राहील.

**विधान भवन,**
**मुंबई.**
**दिनांक : २२ फेब्रुवारी, २०२६.**

**डॉ.विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

**याची प्रत :-**

**१)** महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य.

**२)** मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

**३)** मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

**४)** मा.सचिव (३), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक.

**५)** मा.सचिव (४), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक.

**६)** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.

**७)** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

**८)** संगणक कक्ष (WEBSITE)

**९)** एम.के.सी.एल. प्रशिक्षण विभाग.

----------